महाराष्ट्रातील जनतेचा आक्रोश, दैनिक नांदगांव

# आवाज

संपादक : भगवान सोनवणे

WWW.DAILYAWAZ.COM

**✻ उत्सुकता ✻**




RNI Reg. No.: MAHMAR/2014/66104 ■ वर्ष – १३ वे ■ अंक क्र. – ८२ ■ बुधवार, दि. ७ ऑक्टोंबर २०२६ ■ किंमत – १ रूपया ■ पाने – ४

## कळवण तालुक्यातील मानूर येथे भीषण घरफोडी; अज्ञातांनी ३ लाखांचा ऐवज लांबवला

**दै.आवाज वृत्तसेवा...**

दिपक बागुल कळवण, देसराणे प्रतिनिधी–

६ ऑक्टोबर २०२६ कळवण पोलीस स्टेशनच्या हद्दीतील मानूर गावात मध्यरात्रीच्या सुमारास घरफोडीची एक मोठी घटना घडली आहे. अज्ञातांनी बंद घरांचे कुलूप तोडून घरात प्रवेश करत सोन्या–चांदीच्या दागिन्यांसह रोकड असा एकूण ३,००,०००/– रुपयांचा मुद्देमाल लंपास केला आहे. या घटनेमुळे मानूर व परिसरात एकच खळबळ उडाली आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी राजेंनाथ पंढरीनाथ पवार (वय ६१, रा. मानूर, ता. कळवण) यांनी कळवण पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. दिनांक ६/१०/२०२६ रोजी रात्री २:३० ते सकाळी ४:०० वाजे दरम्यान अज्ञात चोरट्यांनी फिर्यादी आणि त्यांच्या शेजाऱ्यांच्या घरांचे कुलूप तोडले. घरात बेकायदेशीर प्रवेश करून घरातील रोख रक्कम आणि दागिन्यांची चोरी केली.

चोरीला गेलेला ऐवज: १. राजेंनाथ पंढरीनाथ पवार यांच्या घरातील २,००,०००/– रुपये किमतीचे सोन्याचे डोरले, कानातील झुबे, अंगठ्या, चांदीचे भांडे आणि ५०,०००/– रुपये रोख रक्कम. २. संतोष रतन अहिर यांच्या घरातील ५०,०००/– रुपये रोख रक्कम व सोन्याचे मंगळसूत्र. ३. गजेन्द्रनाथ पवार यांच्या घरातील ५०,०००/– रुपये किमतीच्या सोन्याच्या दोन पाटल्या. एकूण ऐवज: ३,००,०००/– रुपये.

घटना समजताच कळवण पोलीस ठाण्याचे अधिकारी तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. या प्रकरणाचा पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी (पान २ वर)

## कळवण शहरात मध्यरात्री घरफोडी; तीन ठिकाणांहून ८१ हजार रुपयांची रोखकड लांबवली

**दै. आवाज वृत्तसेवा...**

दिपक बागुल कळवण / देसराणे प्रतिनिधी कळवण शहरात मंगळवारी (दि.०६) मध्यरात्रीच्या सुमारास अज्ञात चोरांनी धुमाकूळ घातला. शहरातील सुभाष पेठ, गांधी चौक आणि शिवाजी नगर भागात एकाच रात्रीत तीन वेगवेगळ्या ठिकाणी घरफोडी व दुकान फोडीच्या घटना घडल्या. या चोरट्यांनी दुकाने व घरांचे कुलूप तोडून एकूण तीन लख ८१ हजार रुपयांची रोकड लांबवली आहे. या प्रकरणी कळवण पोलीस



ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, घटनेची माहिती मिळताच ब्रह्मदेव शेळके, वरिष्ठ उप विभागीयपोलीस अधिकाऱ्यांनी घटनास्थळाची पाहणी केली आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी कमलेश सोमनाथ कोठावडे (वय ४२, रा. गांधी चौक, कळवण) यांचे गांधी चौकात कापड दुकान आहे. दिनांक ०६ ऑक्टोबर २०२६ रोजी रात्री ३ ते सकाळी ६ वाजेच्या दरम्यान अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या दुकानाचे कुलूप तोडून गल्ल्यातील ५००, २००, १००, २० आणि (पान २ वर)







श्री संत सेवालाल महाराज सेवाभावी संस्था, संचलित

**श्री पिनाकेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय**

(पुणे विद्यापीठ संलग्न)

वसंतनगर, पो. जातेगाव, ता. नांदगाव, जि. नाशिक-४२३१०६

✻ शैक्षणिक वर्ष २०२६–२७ पासून

**B.A./B.Com/B.Sc साठी प्रवेश देणे सुरू आहे.**

प्रवेश पात्रता – १२ वी पास (आर्टस्, कॉमर्स, सायन्स)




**✻ वैशिष्टे ✻**

- ✻ उच्च शिक्षित प्राध्यापक वर्ग
- ✻ भव्य प्रशासकीय व महाविद्यालय इमारत
- ✻ सि.सि.टि.व्ही. कॅम्पस
- ✻ ग्रथालय व वाचनालय स्वतंत्र इमारत
- ✻ मुला–मुलींसाठी स्वतंत्र वसतीगृह सुविधा
- ✻ भव्य सेमिनार हॉल व खेळाचे मैदान
- ✻ मर्यादित विद्यार्थी संख्या

प्रवेशासाठी संपर्क :- ९९२२१७२७९९

पत्ता – कै. गंगाराम धनसिंग राठोड शैक्षणिक संकुल, महादेव रोड, वसंत नगर, पो.जातेगाव, ता. नांदगाव, जि. नाशिक.

✻ प्राचार्य :- मोबा. 9922172799






## संजय कांगणे यांचा सेवानिवृत्तीबद्दल सत्कार

**दै. आवाज वृत्तसेवा ...**

लक्ष्मण घुगे राजापूर प्रतिनिधी - येवला तालुक्यातील राजापूर येथील ज्ञानप्रकाश आश्रम शाळेतील मदतनीस संजय धनालाल कांगणे यांनी २७ वर्षे सेवा पूर्ण करून सेवानिवृत्त झाले या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी ज्ञानप्रकाश आश्रम शाळेचे संस्थापक अध्यक्ष प्रकाश कोल्हे तर प्रमुख पाहुणे येवला तालुका पत्रकार संघाचे सरचिटणीस लक्ष्मण घुगे माजी सरपंच सुभाष वाघ, प्रमोद बोडके, समता परिषदेचे जिल्हा अध्यक्ष ज्ञानेशवर दराडे, दत्ता सानप, माजी सभापती पोपटराव आव्हाड, परशराम दराडे, डॉक्टर सुधीर जाधवमाजी प्राचार्य पि के आव्हाड ज्ञानप्रकाश आश्रम शाळेचे मुख्याध्यापक दीपक जाधव पत्रकार सुदाम गाडेकर,समाधान चव्हाण, शरद वाघ, तुळशीराम विचू, शंकरराव अलगट, गोटु सागळे, जितेंद्र कागणे, रोहिणी सागळे, सिताराम दराडे, व गावातील ग्रामस्थ व पाहुणे होते. आलेल्या सर्व मान्यवरांनी व गावातील ग्रामस्थांनी संजय कांगणे यांनी ज्ञानप्रकाश आश्रम शाळेची सुरुवात झाल्यापासून त्यांनी राजापूर येथे नोकरी करण्यास प्रारंभ केला व २७ वर्षे सेवा करून सर्वांना बरोबर घेऊन आश्रम शाळेत चांगली सेवा करून गोर गरिबाचे विद्यार्थी घडवले आहेत व विद्यार्थ्यांना वेळोवेळी मदत केली आहेत.

यावेळी आश्रम शाळेतील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी गावातील ग्रामस्थ उपस्थित होते व या कार्यक्रम यशस्वीते साठी निखिल कांगणे, सौरभ सौरभ कांगणे, चैतन्या कांगणे, यांनी विशेष परिश्रम घेतले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक कातोरे सर यांनी केले तर आभार वाकचौरे सर यांनी मांनले व त्यांना आश्रम शाळेतील शिक्षकेतर कर्मचारी यांनी मोलाचे सहकार्य केले आलेल्या सर्व मान्यवरांसह पाहुणे व आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांना भोजनाची व्यवस्था सजय कागणे यानी केलेली होती.

## तीन एकर कोबीवर फिरवला रोटावेटर! किलोला दोन रुपयांचा भाव मिळाल्याने नागडे येथे गुलाब सोनवणे यांचा संताप

**दै.आवाज वृत्तसेवा...**

लक्ष्मण घुगे राजापूर प्रतिनिधी : दुष्काळाच्या झळा सोसत, पाण्याचे काटेकोर नियोजन करून तीन एकरांवर उभे केलेले कोबीचे पीक बाजारभावाच्या पडझडीमुळे अक्षरशः मातीत मिसळण्याची वेळ शेतकऱ्यावर आली. नागडे शिवारातील शेतकरी गुलाबराव सोनवणे यांनी सुमारे तीन लाख रुपये खर्च करून उभ्या केलेल्या कोबीला अवघा दोन रुपये किलोचा भाव मिळू लागल्याने संतप्त होऊन पिकात मेंढ्या चरण्यास सोडल्या. त्यानंतर रोटावेटर फिरवून संपूर्ण उभे पीक नष्ट केले. बाजारभावाच्या अनिश्चिततेने शेतकऱ्याला उत्पादन खर्चही वसूल करता येत नसल्याचे या घटनेतून पुन्हा समोर आले आहे.यावर्षी परिसरात दुष्काळाचे तीव्र सावट असल्याने शेतीसाठी पाण्याची उपलब्धता मोठी समस्या बनली आहे.अशा परिस्थितीतही सोनवणे यांनी उपलब्ध पाण्याचे नियोजन करून तीन एकर क्षेत्रात कोबीची लागवड केली.भाजीपाला पिकातून उत्पन्न मिळेल, या अपेक्षेने रोपे, मजुरी, रासायनिक खते, निंदणी तसेच ट्रॅक्टर मशागत यासाठी त्यांनी सुमारे तीन लाख रुपये खर्च केले. पीक काढणीला आल्यानंतर सुरुवातीला कोबीला साडेसहा रुपये किलोचा भाव मिळाला. त्यातून १२ टनाची एक गाडी बाजारात पाठवून सुमारे ८० हजार रुपये मिळाले. मात्र, त्यानंतर बाजारातील आवक वाढल्याने भाव झपाट्याने घसरला. कोबीचा दर अवघा दोन रुपये किलोवर आला.उत्पादन खर्चाच्या तुलनेत हा दर अत्यंत कमी असल्याने उर्वरित पीक विकणेही परवडेनासे झाले. त्यातच व्यापाऱ्यांकडून खरेदीसाठी प्रतिसाद मिळत नसल्याने शेतकऱ्यासमोर मोठे संकट उभे राहिले. अशा परिस्थितीत उभ्या पिकाची काढणी, वाहतूक आणि बाजारात विक्री करण्यासाठी होणारा खर्चही परवडत नसल्याने सोनवणे यांनी तीन एकर कोबीच्या शेतात मेंढ्या सोडल्या. त्यानंतर रोटावेटरच्या साहाय्याने उभे पीक नष्ट केले. कष्टाने उभे केलेले पीक स्वतःच्या डोळ्यांसमोर नष्ट करण्याची वेळ आल्याने ते भावनिक झाले.भाजीपाला पिकांना शाश्वत बाजारपेठ उपलब्ध नसल्याने आवक वाढली की दरात मोठी घसरण होते. परिणामी उत्पादन खर्च, मजुरी आणि वाहतूक खर्चही वसूल होत नसल्याची व्यथा सोनवणे यांनी व्यक्त केली. केवळ शासनाला दोष देण्याऐवजी बाजारातील मागणी आणि पुरवठ्याचा विचार करून पीक नियोजन करण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

## इतिहास प्रसिद्ध अंकाईत पाण्यासाठी महिलांची भटकंती ३८ गाव पाणीपुरवठा योजनेतून गावाला पाणी उंचावरील अंकाईसाठी स्वतंत्र वीजपंप थकीत बिलामुळे वीजपुरवठा खंडित

**दै. आवाज वृत्तसेवा ...**

लक्ष्मण घुगे राजापूर प्रतिनिधी येवला तालुक्यातील इतिहासप्रसिद्ध अंकाई गावात दुष्काळी परिस्थितीमुळे पाणीप्रश्न गंभीर बनला होता अंकाई गावाला ३८ गाव पाणीपुरवठा योजनेतून पाणीपुरवठा केला जातो मात्र अंकाई गाव समुद्रसपाटीपासून उंचावर असल्याने गावाने पाणी उचलण्यासाठी स्वतंत्र वीजपंप बसविला आहे या पंपाचे वीज बिल थकीत राहिल्याने वीजपुरवठा खंडित झाला आणि गावाचा पाणीपुरवठा ठप्प झाला होता त्यातच यंदाच्या दुष्काळी परिस्थितीमुळे ग्रामपंचायतीच्या मालकीच्या विहिरीही कोरड्या पडल्या आहे त्यामुळे गावातील नागरिकांसमोर पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला विशेषतः महिलांना घरगुती वापरासाठी पाणी मिळविण्यासाठी भटकंती करावी लागत होती अंकाई हे इतिहासप्रसिद्ध गाव असून येथील अंकाई-टंकाई हे जोड किल्ले परिसराची ऐतिहासिक ओळख अधोरेखित करतात ऐतिहासिक वारसा लाभलेल्या या गावातील नागरिकांना मात्र सध्या पाण्यासाठी संघर्ष करावा लागत असल्याचे चित्र निर्माण झाले होते ५० हजारांची अनामत रक्कम गावातील पाणीप्रश्नाची गंभीरता लक्षात घेऊन ग्रुप ग्रामपंचायत अंकाईच्या सदस्या सौ. शोभाताई सुधीर जाधव यांनी पुढाकार घेतला त्यांनी ५० हजार रुपये अनामत रक्कम भरून वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी पुढाकार घेतला त्यामुळे बंद असलेला वीजपुरवठा पूर्ववत करण्याचा मार्ग मोकळा झाला असून पाणीपुरवठा सुरळीत करण्याची कार्यवाही सुरू झाली आहे गांधी जयंतीदिनी पाणीपुरवठा सुरळीत होणार २ ऑक्टोबर गांधी जयंतीच्या दिवशी अंकाई गावाचा पाणीपुरवठा सुरळीत होणार असल्याने नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे पाणीपुरवठा पूर्ववत झाल्यानंतर महिलांची पाण्यासाठी होणारी भटकंती कमी होण्याची अपेक्षा आहे दरम्यान दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता अंकाई गावासाठी उपलब्ध जलस्रोतांचे संवर्धन विहिरींचे पुनर्भरण पाणी साठवणूक आणि भविष्यातील नियमित पाणीपुरवठ्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची गरज नागरिकांकडून व्यक्त होत आहे

//अंकाई गावातील नागरिकांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत असताना हा प्रश्न केवळ पाहत बसणे योग्य वाटले नाही गाव उंचावर असल्याने स्वतंत्र पंपाद्वारे पाणीपुरवठा करावा लागतो आणि वीजपुरवठा खंडित झाल्याने पाण्याची मोठी अडचण निर्माण झाली होती. त्यामुळे मी ५० हजार रुपये अनामत रक्कम भरून वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी पुढाकार घेतला गांधी जयंतीच्या दिवशी गावाचा पाणीपुरवठा सुरळीत होऊन नागरिकांना दिलासा मिळावा हीच अपेक्षा आहे पुढील काळात अंकाईचा पाणीप्रश्न कायमस्वरूपी सुटण्यासाठीही प्रयत्न करणार आहे
शोभाताई सुधीर जाधव ग्रामपंचायत सदस्या अंकाई//

## शेतकऱ्याचे मका उत्पादन निम्म्याने घटले पशु चारा विक्रीला शेतकऱ्यांचे प्राधान्य!

**दै.आवाज वृत्तसेवा...**

कोळपेवाडी प्रतिनिधी:-

खरीप हंगामात जेमतेम पावसावर शेतकऱ्यांनी लागवड केलेल्या मका पिकाची वेळेवर पाऊस न पडल्याने ताट पाला व कणसाची पूरेपुर वाढ न झाल्याने मागील वर्षा पेक्षा उत्पादनात निम्म्याने घट झाल्याचे चित्र संबध कोपरगाव तालुक्यात दिसत असून कणीस चिकावर आलेली मका काही शेतकरी जनावरांना चारा म्हणून राखीव ठेवत पशुपालकांना चारा म्हणून विक्रीला प्राधान्य देत आहे.



अलनीनोच्या प्रभावामुळे चालू वर्षी संबध महाराष्ट्रभर सर्व दूर वेळेवर पाऊस न झाल्याने जनतेम पावसावर लागवड करण्यात आलेल्या मका पिकाच्या पोषक वाढीसाठी पाऊसाने अल्प प्रतिसाद दिल्याने खरिब पिक उत्पादनात गोदावरी कालवे पाट पाणी बागायती क्षेत्राखाली पिकात पन्नास टक्क्यांपेक्षा जास्तीची घट झाली आहे तर कोरडवाहू पिके अक्षरशः शेतकऱ्यांच्या डोळ्यादेखत करपली आहेत. दुष्काळाच्या छटा हिवाळ्याच्या ऑक्टोबर महिन्यातच जानवु लागल्याने पशुपालक व्यावसायिकांनी मका पिकाच्या कुट्टीने बॅगा भरून चाऱ्याची टंचाई दूर करण्याचा केविल वाण्या प्रयत्नांची पराकष्टा चालू केली आहे. मागील वर्षी एकरी पंधरा-सोळा टन चारा पिक उत्पादन देणारी मका आजच्या स्थितीला सात ते आठ टनाच्या आसपास येवुन प्रति टन २८०० ते ३२०० रुपये भावाने जागेवर विकली जात आहे. मागल वर्षी हाच भाव १८०० ते २००० च्या आसपास होता. कोपरगाव तालुक्याच्या पश्चिम भागात कुट्टी पोहोच व्यावसायिक सकाळ पासून रात्री उशिरापर्यंत विजेच्या प्रकाशात शेतकरी व कुट्टी खरेदी पशुपालक यांच्यात समन्वय ठेवून मकाची सोंगणी करुन कुट्टी ट्रॅक्टर च्या साह्याने पशुपालकांच्या दारात बॅगेत वेळेवर भरण्यासाठी दिवस-रात्र एक करत असून हंगामी मजुरांच्या जोडप्याला किमान दोन हजाराच्या पुढे रोजगार देत व्यवसाय उद्दिष्टे वाढविण्यासाठी अनेकांनी मध्य प्रदेश महाराष्ट्रातील कोकण सह्याद्री पर्वतरांग आदिवासी भागातून मजूर आणुन आपल्या व्यवसायाचा विस्तार केला असल्याचे चित्र बघावयास मिळत आहे.

## कळवण तालुक्यातील मानूर....

(पान १ वरून) ब्रह्मदेव शेळके, पोलीस निरीक्षक प्रदीप देशमुख, सपोनिरी रोहिदास ठोंबरे, पोउनिरी निशांत अहिरे, पोलीस हवा. निलेश शेवाळे, पोलीस हवा. संजय दळवी, पोलीस शिपाई पंकज शेवाळे, पोलीस शिपाई चंद्रकांत चौधरी, हे करत आहेत. दाखल अंमलदार (मसपोउनिरी/बर्डे) तसेच गुन्हाच्या तपासासाठी नाशिक ग्रामीणचे फिंगरप्रिंट तज्ज्ञ सपोनिरी कांबळे यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली आहे. कळवण पोलिसांनी अज्ञात चोराविरोधात भारतीय न्याय संहिता (BNS) कलम ३०५, ३३१(४) अन्वये गुन्हा दाखल केला असून, चोरट्यांचा शोध घेण्यासाठी चक्रे वेगाने हालवली जात आहेत. परंतु मध्यरात्री झालेल्या या धाडसी चोरीमुळे कळवण शहरासह गाव खेड्यातही नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून, रात्रीची गस्त वाढवण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

## कळवण शहरात मध्यरात्री ...

१० रुपयांच्या चलनातील ७० हजार रुपयांची रोख रक्कम चोरली. तसेच, याच रात्री चोरट्यांनी सुभाष पेठ येथील प्रथमेश उर्फ स्वामी कैलास देवघरे यांच्या दुकानातील गल्ल्यातून २ हजार रुपये आणि शिवाजी नगर येथील राकेश शिवाजी आहेर यांच्या राहत्या घरच्या कपाटातून ९ हजार रुपयांची रोख रक्कम असा एकूण ८१ हजार रुपयांचा मुद्देमाल लांबवला. घटनेची माहिती समजताच कळवण पोलीस ठाण्यात BNS कलम ३०५, ३३१(४) प्रमाणे अज्ञात चोरांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा तपास पोलीस हवालदार तिडके करत आहेत. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन उपविभागीय पोलीस अधिकारी ब्रह्मदेव शेळके, पोलीस निरीक्षक प्रदीप देशमुख, सहायक पोलीस निरीक्षक रोहिदास ठोंबरे पोलीस हवालदार प्रशांत तिडके, कृष्णा गवळी, देवेंद्र हिरे आणि नाशिक ग्रामीणचे फिंगरप्रिंट तज्ज्ञ सहायक पोलीस निरीक्षक कांबळे यांनी तात्काळ घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली व तपासाबाबत आवश्यक त्या सूचना दिल्या. मध्यरात्री झालेल्या या धाडसी चोरीमुळे कळवण शहरात व्यापारी आणि नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून, रात्रीची गस्त वाढवण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, संपादक, प्रकाशक, भगवान नामदेव सोनवणे यांनी शार्प ऑफसेट, मालेगांव बस स्टँड समोर, मालेगांव येथे छापून ढासे मळा, सावता नगर, नांदगांव ता.नांदगांव, जि.नाशिक येथे प्रकाशित केले. सहसंपादक भाऊसाहेब हुजबंद. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या, लेख, जाहिराती यामधून व्यक्त झालेल्या मतांशी मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक, सहसंपादक सहमत असतीलच असे नाही. मुद्रण दोष संभवनीय. (नांदगांव न्यायकक्षेत) सर्व अधिकार सुरक्षित. मो. ९५४५९१०१७७ - ९२७२४५३९२१ email : nandgaonawaz@gmail.com

# निफाडच्या महसूल लोक अदालतीत २८ प्रकरणांचा निपटारा

## प्रांताधिकारी डॉ. शशिकांत मंगरुळे यांच्या मार्गदर्शनाखाली अभियानाला यश

**दै.आवाज वृत्तसेवा...**

शिरवाडे वाकद:- निफाडचे प्रांताधिकारी डॉ. शशिकांत मंगरुळे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या 'महात्मा जोतीराव फुले महसूल लोक अदालत अभियानात' वादी - प्रतिवादींमध्ये समुपदेशनातून २८ प्रकरणांचा सामोपचाराने निपटारा करण्यात आला.

महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वनविभाग तसेच जिल्हाधिकारी, नाशिक यांच्या निर्देशानुसार सोमवार दि ५ सप्टेंबर रोजी उपविभागीय अधिकारी कार्यालय व तहसील कार्यालय, निफाड येथे या अभियानाचे आयोजन करण्यात आले. महसूल विभागातील प्रलंबित अर्धन्यायिक प्रकरणे जलदगतीने आणि परस्पर संमतीने निकाली काढणे, हा या अभियानाचा मुख्य उद्देश होता.

या लोक अदालतीसाठी उपविभागीय अधिकारी कार्यालयाकडील १८१ प्रकरणे, तर तहसील कार्यालयाकडील मामलेदार कोर्ट क्ट १९०६ चे कलम ५ व महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १४३ अन्वये दाखल असलेली १०४ वहिवाट प्रकरणे तडजोडीसाठी ठेवण्यात आली होती. पक्षकारांशी संवाद साधण्यासाठी चार स्वतंत्र टेबलची व्यवस्था



करण्यात आली होती. उपविभागीय अधिकारी कार्यालयाकडील २४ तर तहसील कार्यालयाकडील ४ अशा एकूण २८ प्रकरणांमध्ये यशस्वी तडजोड झाली. संबंधित वादी, प्रतिवादी व विधिज्ञांच्या स्वाक्षऱ्या घेऊन समेटाची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. उर्वरित प्रकरणांसाठी पुढील तारखा देण्यात आल्या.

लोक अदालतीच्या कामकाजासाठी महसूल सहायक शरद घाटगे, मंडळ अधिकारी जयंत लिलके, उल्हास टर्ले, गोविंद काळे, अश्विनी भोसले तसेच महसूल सहायक ललित खैरे, गणेश कुमावत, नितीन भोई व अंबादास पिठे यांनी काम पाहिले. निफाड बार असोसिएशनचे अध्यक्ष प्रवीण ठाकरे यांच्यासह विधिज्ञांचे सहकार्य लाभले.

✻ महसुली प्रकरणात पक्षकारांचा वेळ, पैसा आणि मानसिक ऊर्जा मोठ्या प्रमाणात खर्च होते. परस्पर संवाद आणि समुपदेशनातून वाद मिटल्यास दोन्ही बाजूंचा वेळ वाचतो आणि अनावश्यक खर्चही टाळता येतो. महसूल लोक अदालत ही नागरिकांना जलद, सुलभ आणि सामोपचाराचा मार्ग उपलब्ध करून देणारे प्रभावी व्यासपीठ आहे.
डॉ.शशिकांत मंगरुळे,
प्रांताधिकारी, निफाड

✻ पक्षकारांनी आपले वाद सामंजस्याने मिटविण्यासाठी पुढाकार घेतल्यास महसूल विभागालाही प्रकरणांचा जलद निपटारा करता येतो. लोक अदालतीमुळे नागरिकांना कार्यालयीन आणि न्यायालयीन प्रक्रियेसाठी वारंवार होणारी धावपळ कमी होण्यास मदत होते.
विशाल नाईकवाडे,
तहसीलदार, निफाड

# मनपा आयुक्त दालनातील अंधश्रद्धायुक्त वस्तू हटवा; अंनिसचे निवेदन

**दै.आवाज वृत्तसेवा...**

शिरवाडे वाकद :- नाशिक महानगरपालिकेच्या आयुक्तांच्या दालनात खडेयुक्त पांढरे मीठ एका बाऊलमध्ये ठेवण्यात आल्याचे निदर्शनास आले असून, ही वस्तू तत्काळ हटवावी, अशी मागणी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या वतीने निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, खडेयुक्त पांढरे मीठ दालनात ठेवल्यामुळे तेथे येणाऱ्या व्यक्तींच्या मानसिकतेत सकारात्मक बदल होतो आणि त्यामुळे वादविवादाचे प्रसंग टाळले जातात, अशी धारणा असल्याचे सांगितले जाते. मात्र, अशा प्रकारच्या समजुतींना कोणताही वैज्ञानिक आधार नसल्याने त्या अंधश्रद्धेला खतपाणी घालणाऱ्या ठरू शकतात.

जर दालनात मीठ ठेवल्यामुळे व्यक्तींच्या मानसिकतेत सकारात्मक बदल होत असतील, तर मिठाच्या दुकानांमध्ये किंवा विक्रेत्यांच्या घरांमध्ये वादविवादाचे प्रसंग घडू नयेत, असा सवालही समितीने उपस्थित केला आहे. त्यामुळे अशा अवैज्ञानिक बाबींना शासकीय कार्यालयात स्थान दिल्यास सामान्य नागरिकांच्या मनात अंधश्रद्धा बिंबवण्याचा धोका असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

भारतीय राज्यघटनेने प्रत्येक नागरिकाचे मूलभूत कर्तव्य म्हणून वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करण्याचे आवाहन केले आहे. या पार्श्वभूमीवर शासकीय कार्यालयात अंधश्रद्धेला प्रोत्साहन देणाऱ्या बाबी ठेवणे हे संविधानातील वैज्ञानिक दृष्टिकोनाच्या मूल्यांशी विसंगत आहे तसेच कोणत्याही धर्माची प्रतीके किंवा चमत्कारसदृश्य बाबींना शासकीय कार्यालयात स्थान देणे हे धर्मनिरपेक्षतेच्या मूल्यांशीही विसंगत असल्याचा दावा निवेदनातून करण्यात आला आहे. लोकसेवेची कामे कोणत्याही गैरप्रकाराविना, गुणवत्तापूर्ण आणि वेळेत झाली, तर नागरिकांच्या मनात अधिकारी व प्रशासनाबद्दल विश्वास, आदर आणि आपुलकी निर्माण होते. त्यासाठी अशा प्रतीकात्मक किंवा अंधश्रद्धायुक्त वस्तूंची आवश्यकता नसल्याचे समितीने स्पष्ट केले आहे.

या निवेदनावर महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य प्रधान सचिव डॉ. टी. आर. गोराणे, राज्य सदस्य कृष्णा चांदगुडे, प्रल्हाद मिस्त्री आणि महेंद्र दातरंगे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# माजी खासदार समीर भुजबळ यांचा वाढदिवसाचा उत्सव टाळून दुष्काळग्रस्तांच्या मदतीला प्राधान्य

**दै.आवाज वृत्तसेवा...**

येवला, दि. ६ ऑक्टोबर :- येवला लासलगाव विधानसभा मतदारसंघात निर्माण झालेली दुष्काळाची गंभीर परिस्थिती लक्षात घेऊन माजी खासदार समीर भुजबळ यांचा ९ ऑक्टोबर २०२६ रोजी असलेला वाढदिवस यंदा कोणताही मोठा उत्सव न करता सामाजिक बांधिलकी जपत साधेपणाने साजरा करण्यात येणार आहे. वाढदिवसानिमित्त होणारा अनावश्यक खर्च टाळून तो निधी दुष्काळग्रस्तांच्या मदतीसाठी उपयोगात यावा, या उद्देशाने येवला शहरासह संपूर्ण येवला मतदारसंघात मोफत आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे. त्याचबरोबर शुभेच्छांच्या माध्यमातून वह्या, पुस्तके व शालेय साहित्य संकलित करून गरजू विद्यार्थ्यांना वितरित तसेच दिव्यांग बांधवांना उपयोगी साहित्याचे वाटप करण्यात येणार असल्याची माहिती संपर्क कार्यालयाच्या वतीने देण्यात आली आहे.

येवला मतदारसंघातील शेतकरी, शेतमजूर आणि ग्रामीण भागातील सर्वसामान्य नागरिक सध्या दुष्काळाच्या संकटाचा सामना करत आहेत. अशा परिस्थितीत वाढदिवस हा केवळ शुभेच्छा स्वीकारण्याचा आणि उत्सव साजरा करण्याचा दिवस न राहता संकटग्रस्तांच्या मदतीचा, गरजूंच्या आधाराचा आणि सामाजिक संवेदनशीलतेचा दिवस ठरावा, या भावनेतून यंदा दोन्ही वाढदिवसांच्या निमित्ताने सामाजिक उपक्रमांना प्राधान्य देण्यात आले आहे. दुष्काळामुळे अडचणीत आलेल्या शेतकरी व गरजू कुटुंबांना शक्य ती मदत उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. वाढदिवसाचा आनंद समाजाच्या उपयोगी यावा या भावनेतून राबविण्यात येणारा हा उपक्रम सामाजिक बांधिलकीचा आदर्श निर्माण करणारा ठरणार आहे.माजी खासदार समीर भुजबळ यांच्या वाढदिवसानिमित्त दि. ९ ऑक्टोबर २०२६ पासून येवला शहरातून मोफत आरोग्य तपासणी शिबिरास सुरुवात करण्यात येणार असून येवला मतदारसंघातील सर्व गटामध्ये आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे. या शिबिरांमध्ये नागरिकांची आवश्यक आरोग्य तपासणी, तज्ज्ञ डॉक्टरांकडून मार्गदर्शन व आवश्यक उपचार करण्यात येणार आहेत. तपासणीदरम्यान शस्त्रक्रियेची आवश्यकता असलेल्या रुग्णांच्या आवश्यक शस्त्रक्रिया करून देण्यासाठीही पुढाकार घेण्यात येणार आहे. तसेच दिव्यांग बांधवांना काठी, फोल्डिंग बेड, व्हीलचेअर, वॉकर यासह आवश्यक उपयोगी साहित्य वाटप करण्यात येणार आहे. त्यामुळे ग्रामीण तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असून, आर्थिक अडचणींमुळे उपचारांपासून वंचित राहणाऱ्या रुग्णांना आरोग्यसेवेचा आधार मिळणार आहे. माजी खासदार समीर भुजबळ यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देण्यासाठी येणाऱ्या नागरिकांनी हार, पुष्पगुच्छ किंवा शाल आणू नये, त्याऐवजी वह्या, पुस्तके आणि शैक्षणिक साहित्य भेट स्वरूपात आणावे, असे आवाहन करण्यात आले आहे. या संकलित होणाऱ्या वह्या, पुस्तके व शैक्षणिक साहित्याचे येवला मतदारसंघातील गरीब, गरजू व दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांना वाटप करण्यात येणार आहे. माजी खासदार समीर भुजबळ हे शुक्रवार, दि. ९ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत येवला संपर्क कार्यालयात शुभेच्छा स्वीकारण्यासाठी उपलब्ध असणार आहेत. दरवर्षी वाढदिवसानिमित्त होणारा उत्सव यंदा दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर टाळून 'शुभेच्छा समाजासाठी, मदत दुष्काळग्रस्तांसाठी, आरोग्यसेवा गरजूंसाठी आणि साहित्य विद्यार्थ्यांसाठी' या भावनेतून वाढदिवस सामाजिक उपक्रमांना समर्पित करण्यात येणार आहेत. वाढदिवसानिमित्त मिळणाऱ्या शुभेच्छांचे रूपांतर दुष्काळग्रस्तांच्या मदतीत, गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणात आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांच्या उपचारात व्हावे, हा या उपक्रमांचा मुख्य उद्देश आहे.




# मृत्यूनंतरही आपली कीर्ती कायम राहील, असे वागावे – व्याख्याते इंद्रजीत देशमुख यांचे प्रतिपादन

**दै.आवाज वृत्तसेवा...**

**विंचूर** – जगण्यावर प्रेम करा, सरळ मार्गाने व निसर्ग नियमानुसार जगा. या भूतलावरील सर्व गोष्टी नश्वर आहेत. एक दिवस वृद्धापकाळ येणार आहे, याचे भान ठेवून विनम्रतेने जगावे. चांगुलपणाने आयुष्य व्यतीत करून पुढील पिढीला शांत व सुंदर आयुष्य देऊन जावे. मृत्यू अटळ आहे. त्यामुळे मृत्यूपूर्वी अशी कीर्ती मिळवावी की मृत्यूनंतरही आपली कीर्ती कायम राहील, असे वागावे, असे प्रतिपादन शिवम् प्रतिष्ठान, धारेवाडीचे संस्थापक इंद्रजीत देशमुख यांनी केले.देशमुख हे येथील निसर्ग मंगल कार्यालयात आयोजित मातोश्री कै. सौ.विमलबाई दुसाने स्मृती व्याख्यानमालेचे माणसाने माणसाशी माणसासमं वागणे या विषयावर तिसरे पुष्प गुंफताना बोलत होते. प्रारंभी सचिन देशमुख यांच्या हस्ते



अतिथींचे स्वागत करण्यात आले.तर मालेगाव येथील उद्योजक किशोर थोरात यांच्या हस्ते आभारपत्र देण्यात आले. पुढे बोलताना देशमुख यांनी आज माणसाला पैशाची नशा लागली असून स्वतःला जात, धर्म, पंथ, समाज यांसारख्या बंधनात अडकवून घेतले आहे. निसर्गाने मानवाला बुद्धी दिली. मात्र या बुद्धीचा वापर गावकी-भावकीत द्वेष, मत्सर निर्माण करण्यासाठी केला जात आहे. स्वतः सर्वश्रेष्ठ असल्याच्या आविर्भावात जगत असल्याने माणूस कायम दुःखी राहतो. सुखी आयुष्यासाठी माणसाने एकमेकांमध्ये दुरावा निर्माण होईल, असे वागू नये. दुसऱ्याच्या आनंदात स्वतःचा आनंद शोधावा, संत साहित्याचा अंगीकार करावा आणि महापुरुषांचे आदर्श डोळ्यांसमोर ठेवावेत. घरात ग्रंथ असावेत, माणसा-माणसातील माणुसकी जागी करून आपल्या आजूबाजूला कोणीही उपाशी किंवा शिक्षणापासून वंचित राहणार नाही याची काळजी घ्यावी. सरळ मार्गाने जगल्यास आयुष्य सुंदर होते, असे उद्गार काढले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिलीप कोथमिरे यांनी केले, तर अविनाश दुसाने यांनी आभार मानले.

# ऋतुरंग भवन मध्ये ९ ऑक्टोबर रोजी ' मेहेकी यादे -एक शाम अमिताभ- रेखाके नाम ' बहारदार गीतांचा कार्यक्रम

दै.आवाज वृत्तसेवा ...

नाशिकरोड : एस व्ही कराओके सिंगिंग क्लब, नाशिकरोड आयोजित संजय परमसागर व विनोद बर्वे प्रस्तुत ' मेहेकी यादे -एक शाम अमिताभ रेखा के नाम ' ( पुष्प १० वे ) हा कार्यक्रम शुक्रवार दि. ९ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५. ४५ वाजता ऋतुरंग भवन, नाशिकरोड येथे आयोजित करण्यात आला आहे. यात एकूण २२ गायक आपले गायन कौशल्य सादर करणार आहेत. महानायक सुपरस्टार अमिताभ बच्चन व अभिनेत्री रेखा यांच्या सुपरहिट चित्रपटातील बहारदार हिंदी गाजलेल्या गीतांचा आनंद अनुभवता येणार आहे . यात गायक संजय परमसागर



यासह विनोद बर्वे, गॉडविन लुईस, वनिता आहेर, दत्तात्रय पाटील, सुदेश आमेसर, डॉ. सुनायना भुजबळ, स्वप्ना गोखले, वैशाली राजपुत, स्मिता पोटे, विठ्ठल श्रीवंत, परमेश्वर चिंतकिंदी, अनिल पांचाळ, संतोष जोशी, राजेंद्र माळी, प्रितम आमेसर, अनुपमा क्षीरसागर, प्रज्ञा गोपाळे, रोहीत कुलकर्णी, पद्मा देशपांडे, अर्चना पगारे, वैशाली बर्वे आदी गायक आपल्या सुरेल आवाजात गाणी सादर करणार आहेत. ध्वनी व्यवस्था सुरेश काफरे आणि सूत्रसंचालन नीता देशमुख करणार आहेत. कार्यक्रम वेळेवर सुरू होईल. उपस्थित ३ भाग्यवंतांना आकर्षक भेटवस्तु दिली जाईल. कार्यक्रमास प्रवेश मोफत असून जास्तीत जास्त रसिक श्रोत्यांनी उपस्थित राहून कार्यक्रमाचा आनंद घ्यावा असे संयोजकांनी कळवले आहे .

# आध्यात्मिक आनंदाचा आर्थिक परिस्थितीशी संबंध नाही – व्याख्याते डॉ. विजयकुमार फड यांचे प्रतिपादन

दै.आवाज वृत्तसेवा...

विंचूर – तुज आहे तुजपाशी या संतवचनाप्रमाणे आनंद हा प्रत्येकाच्या अंतःकरणात दडलेला असतो. तो शोधण्याची गरज असून, अंतर्मनातील आनंदाचा शोध घेण्यासाठी अध्यात्माची मोठी मदत होते. पंढरपूरची वारी वारकरी ज्या आनंदाने पूर्ण करतो, त्याच भाव-नेने कुटुंबाचीही वारी आनंदाने पूर्ण केली पाहिजे. आनंदाचे मूळ भौतिक सुखात नसून आध्यात्मिक आनंदाचा आर्थिक परिस्थितीशी संबंध नसतो. असे प्रतिपादन माजी आयएएस अधिकारी डॉ. विजयकुमार फड यांनी केले. डॉ. फड हे येथील निसर्ग मंगल कार्यालयात आयोजित मातोश्री विमलबाई दुसाने स्मृती व्याख्यानमालेत 'आध्यात्माकडून कौटुंबिक आनंदाकडे' या विषयावर पहिले पुष्प गुंफताना बोलत होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी संजय गगड यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. तर शंतनु पाटील यांनी पाहुण्यांना आभारपत्र दिले. पुढे बोलताना डॉ. फड यांनी माणूस अनेकदा अनावश्यक गोष्टींमध्ये अडकतो त्यामुळे स्वतःसह कुटुंबाचाही आनंद



हिरावून घेतो. आई-वडील आणि मुलांचे नाते कोणत्याही वयात कायम असते. मात्र, वयानुसार एकमेकांकडून अपेक्षा वाढत जातात आणि त्यातून कुटुंबात तणाव निर्माण होतो. त्यामुळे योग्य वेळी कुटुंबाच्या जबाबदाऱ्या मुलांकडे सोपविणे आवश्यक आहे.सुना आणि मुलींमध्ये भेदभाव करू नये. जीवनात आवश्यक तेथे तडजोड करून परिस्थितीशी जुळवून घेतले पाहिजे. कौटुंबिक एकता टिकवून ठेवत कुटुंबातील आनंद कायम ठेवावा. कुटुंब आणि अध्यात्म यांची योग्य सांगड घालून आनंदी जीवन जगावे, असे आवाहनही डॉ. फड यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिलीप कोथमिरे यांनी केले, तर अविनाश दुसाने यांनी आभार मानले.

# कै.नाना ओक स्मृती आयटीसी संगीत संमेलन

दै.आवाज वृत्तसेवा ...

नाशिक (प्रतिनिधी) येथील ओक परिवार व आयटीसी संगीत रिसर्च अकॅडमी (कोलकाता) यांच्या संयुक्त विद्यमाने दि.७ व ८ ऑक्टोबर रोजी कै.नाना ओक स्मृती संगीत संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. संयोजक अर्चन ओक यांनी अशी माहिती दिली.

दोन्ही दिवशी गंगापूर रोडवरील शंकराचार्य न्यासाच्या डॉ. कुर्तकोटी सभागृहात सायंकाळी ६ ते ९ या वेळेत हे संगीत संमेलन होईल. सर्व रसिकांना विनामूल्य प्रवेश आहे. दि.७ रोजी श्रेया चटर्जी यांचे शास्त्रीय गायन होण-ार असून त्यांना तबल्यावर आशय कुलकर्णी व संवादिनीवर अमेय बिच्चू साथसंगत करतील.नंतर अबिर होसेन यांचे सरोद वादन होईल. त्यांना यशवंत वैष्णव तबलासाथ करणार आहेत. दि. ८ रोजी परमानंद रॉय यांचे बासरी वादन होईल. त्यांना तबलासाथ यशवंत वैष्णव करणार आहेत. संगीत संमेलनाचा सुरेल समारोप पं. उल्हास कशाळकर यांच्या शास्त्रीय गायनाने होईल. त्यांना तबल्यावर पं.सुरेश तळवलकर यांची दमदार साथ लाभणार आहे. संवादिनी साथ अमेय बिच्चू करतील. या विनामूल्य संगीत संमेलनाला नाशिककर रसिक श्रोत्यांनी उपस्थित राहावे असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

# बाळूमामाच्या पालखीचे नाव सांगत शेळीपालकाला गुंगीचा स्प्रे; १५ हजारांचा बोकड चोरीला विष्णूनगर परिसरात खळबळ

दै.आवाज वृत्तसेवा...

विंचूर, - बाळूमामाच्या पालखी-तून आल्याचे सांगत एका शेळीपालकाला गुंगी आणणारा स्प्रे मारून १५ हजार रुपये किमतीचा बोकड चोरून नेल्याची धक्कादायक घटना विष्णूनगर परिसरात घडली. या घटनेमुळे परिसरातील शेळीपालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. विष्णूनगर येथील शेळीपालक माणिक घायाळ हे ता. १ रोजी दुपारी परिसरात आपल्या शेळ्या चारत होते. यावेळी दोन अनोळखी व्यक्ती त्यांच्याजवळ आल्या. त्यांनी आम्ही बाळूमामाच्या पालखीतून आलो असून बाळूमामासाठी बोकड द्या, असे सांगितले. बोलणे सुरू असतानाच संबंधित व्यक्तींनी माणिक घायाळ यांच्या चेहऱ्यासमोर काहीतरी स्प्रे मारला. त्यामुळे घायाळ हे बेशुद्ध पडले. या संधीचा फायदा घेत अनोळखी व्यक्तींनी १५ हजार रुपये किमतीचा बोकड चोरून नेला. काही वेळानंतर माणिक घायाळ शुद्धीवर आल्यानंतर आपल्या शेळ्यांच्या कळपातील बोकड गायब असल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यानंतर हा प्रकार उघडकीस आला. दरम्यान, परिसरात शेळ्या चोरीच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याने शेळीपालकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. शेळ्या चारण्यासाठी बाहेर घेऊन जाणे-ही आता धोक्याचे वाटू लागले आहे. त्यामुळे वाढत्या चोरीच्या घटनांना आळा घालावा, अशी मागणी परिसरातील पशुपालकांकडून होत आहे.

# पंढरपूरच्या विठ्ठल-रखुमाई मंदिरात निफाड तालुका वारकरी महामंडळाचे १३५ वे भजन

दै.आवाज वृत्तसेवा ...

विंचूर - निफाड तालुका वारकरी महामंडळाच्या वतीने गेल्या पाच वर्षांपासून प्रत्येक शुद्ध व वद्य एकादशीला तालुक्यातील विविध गावांमध्ये अखंडपणे भजनसेवेचा उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत आतापर्यंत १३४ भजने पूर्ण झाली असून, महामंडळाचे १३५ वे भजन मंगळवार, ता. ६ ऑक्टोबर रोजी इंदिरा एकादशीच्या पवित्र पर्वावर श्रीक्षेत्र पंढरपूर येथील श्री विठ्ठल-रखुमाई मंदिराच्या सभामंडपात होणार आहे. विठुरायाच्या चरणी भजनसेवा अर्पण करण्याचा हा दुर्मिळ आणि भाग्याचा योग महामंडळाच्या पदाधिकारी व सदस्यांना लाभणार आहे. भूलोकीचे वैकुंठ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्रीक्षेत्र पंढरपूर येथील विठ्ठल-रखुमाई मंदिरात भजनसेवा करण्याची ही सुवर्णसंधी महाराष्ट्र राज्य वारकरी महामंडळाचे अध्यक्ष ह.भ.प. रामेश्वर महाराज शास्त्री व ह.भ.प. औसेकर महाराज यांच्या प्रयत्नातून आणि मार्गदर्शनातून उपलब्ध झाली आहे. निफाड तालुका वारकरी महामंडळाने गेल्या पाच वर्षांपासून प्रत्येक एकादशीला निफाड तालुक्यातील वेगवेगळ्या गावांमध्ये दुपारी १२ ते ४ या वेळेत भजनाचे आयोजन केले आहे. भक्तिभाव, वारकरी संप्रदायाचा प्रचार आणि हरिनामाचा गजर या उद्देशाने सुरू झालेल्या या उपक्रमाने १३४ भजनांचा टप्पा पूर्ण केला आहे. या अखंड भजनसेवेची फलश्रुती म्हणून १३५ वे भजन थेट पंढरपूरच्या विठ्ठल-रखुमाई मंदिरात होणार असल्याने वारकरी बांधवांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. या भजनसेवेसाठी निफाड तालुका वारकरी महामंडळाचे पदाधिकारी भाऊसाहेब भवर, दत्तात्रय डुकरे, विश्वनाथ वाघ, बाळकृष्ण महाराज ठोके शास्त्री, रामभाऊ जगताप, अशोकराव गाजरे, बंडोपंत धारराव, मधुकर ठोंबरे, बाळनाथ काकडे, ज्ञानेश्वर भडांगे, राजेंद्र दरेकर, रावसाहेब जाधव, गणपतराव थेटे, लक्ष्मण महाराज पडोळ, सोपानराव गाडे, कार्तिक महार-ाज, संपतराव ढोमसे, केशव महाराज घोटेकर, ऋषिकेश गाडे, सुहास मुरकुटे यांच्यासह महामंडळाचे पदाधिकारी व सदस्य सहभागी होणार आहेत. सर्व वारकरी बांधव सोमवार, ता. ५ ऑक्टोबर रोजी दुपारी ३.३० वाजता निफाड येथून एसटी महामंडळाच्या बसने पंढरपूरकडे प्रस्थान करणार आहेत. विठ्ठल-रखुमाईच्या पवित्र मंदिरात हरिनामाचा गजर करत भजनसेवा अर्पण करण्याची संधी मिळत असल्याने महामंडळाचे पदाधिकारी व सदस्यांमध्ये आनंदाचे आणि भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे.

# ओबीसी विद्यार्थ्यांच्या शिक्षण व रोजगाराच्या संधी विस्तारण्यासाठी योजनांना गती द्या - मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

दै.आवाज वृत्तसेवा ...

मुंबई, दि. ६ : इतर मागास बहुजन समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या समान संधी उपलब्ध करून देण्यासाठी वसतिगृह, स्वाधार योजना, शिष्यवृत्ती तसेच महाज्योतीच्या विविध उपक्रमांना अधिक बळकटी देऊन त्यांच्या अंमलबजावणीला गती द्यावी, असे निर्देश महसूलमंत्री तथा इतर मागासवर्ग मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले. मराठा समाजासाठी नेमण्यात आलेल्या शिंदे समितीप्रमाणे विमुक्त जाती, भटक्या जमातींच्या समस्यांचा अभ्यास करुन अहवाल देण्यासाठी समिती नेमण्याबाबत प्रस्ताव तयार करण्याची सूचना यावेळी करण्यात आली.

मंत्रालयात मंत्री बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या इतर मागा-सवर्ग मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत ओबीसी समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक स्थितीशी संबंधित विविध विषयांवर सकारात्मक चर्चा झाली. उच्च शिक्षण, स्पर्धा परीक्षा, कौशल्य विकास आणि रोजगाराच्या संधींसाठी शासनाच्या योजनांचा लाभ विद्यार्थ्यांपर्यंत अधिक प्रभावीपणे पोहोचविण्यावर उपसमितीने भर दिला.

महाज्योतीच्या विविध योजनांसाठी आवश्यक निधी आणि पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याचाही बैठकीत आढावा घेण्यात आला. महाज्योतीच्या योजनेतर खर्चासाठी २०२५-२६ मध्ये ४९९ कोटी रुपये आणि बांधकामासाठी २२८.६४ कोटी रुपये निधी वितरित करण्यात आला आहे. २०२६-२७ साठी योजनेतर खर्चाकरिता २९९ कोटी रुपये आणि बांधकामासाठी २५ कोटी रुपयांची अर्थसंकल्पीय तरतूद आहे. लोकसंख्येच्या प्रमाणात संस्थेला निधी उपलब्ध करून देण्यासाठी एकूण एक हजार ३०० कोटी रुपयांचा प्रस्ताव वित्त विभागाकडे सादर करण्यात आल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

महाज्योतीमार्फत राबविण्यात येणारे स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण, पीएच.डी. अधिछात्रवृत्ती आणि इतर शैक्षणिक उपक्रमांचा लाभ पात्र विद्यार्थ्यांना पारदर्शकपणे द्यावा. निवड यादी गुणांसह संकेतस्थळावर प्रसिद्ध करावी आणि तालुकास्तरावरील शिबिरे, शाळा, महाविद्यालये तसेच विविध संस्थांच्या माध्यमातून योजनांची व्यापक प्रसिद्धी करावी, अशा सूचनाही मंत्री बावनकुळे यांनी दिल्या.

ओबीसी समाजातील युवकांना स्वयंरोजगार आणि कौशल्य विकासाच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी महामंडळांच्या कर्ज, व्याज परता-वा आणि प्रशिक्षण योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यावरही बैठकीत भर देण्यात आला. जिल्हास्तरावर विविध महामंडळांचे अर्ज स्वीकारण्यासाठी एक खिडकी सुविधा कार्यान्वित करून पात्र लाभार्थ्यांना ऑनलाइन पद्धतीने योजनांचा लाभ सुलभतेने उपलब्ध करून देण्याच्या कार्यवाहीबाबत बैठकीत चर्चा करण्यात आली.

भटक्या विमुक्तांना महसूल विभागामार्फत देण्यात येणारे विविध दाख-ले देण्यासाठी विशेष अभियान राबविले जाईल असे सांगून वसतिगृहे, समाजमंदिर, अभ्यासिका, वसाहती यांच्यासाठी जागा देण्याबाबत सर्वंकष आराखडा तयार करण्याचे निर्देश मंत्री बावनकुळे यांनी यावेळी दिले.